**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी ?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

**: संपादिका :**

**सुहासिनी कीर्तिकर**

**: कार्यकारी संपादकमंडळ :**

**मिनाक्षी जयकर**
**मयुरा नायक**
**संजना कोठारे**
**वैजयंती कीर्तिकर**

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८६ वे) प्रभुतरुण मुंबई, शनिवार, ता. १६ माहे जुलै, सन २०११ (अंक ९८४**


*संपादकीय*

## ये रे, ये रे पावसा....

**-सुहासिनी कीर्तिकर**

‘नेमेचि येतो मग पावसाळा, सृष्टीचे कौतुक जाण बाळा’ या ओळी ऐकत ऐकतच आपले सर्वांचे बालपण दुडदुडले. ‘पाऊस खुळा बाई, पाऊस खुळा’ अशा ओळी स्वयंपाकघरात गुणगुणत खुळेपणाला शृंगारत. पुढे शाळा मागे लागली की ‘पावसाच्या धारा, येती झराझरा, झाकोळले नभ, सोसाट्याचा वारा’ कवितेतून घुमू लागे. कधी ‘धारा आकाशीच्या अमृताच्या ’ म्हणत अंगणात नाचून ‘पाऊस पडू दे घडोघडी, भिजू दे आमुची शेतीवाडी’ अशी विनवणी केली जाई. तो पडावा म्हणून खोट्या पैशाची लालूच तर गाण्यातून सगळेच दाखवीत. ‘पांघरून अंगावरी भरजरी शेला’ हिरवाई मग खुलत जाई. ‘थेंब थेंब तळ्यात पडती रे, टपटप पानात वाजती रे’ म्हणत अशावेळी मोराला साद घालत ‘खेळ खेळू दोघांत’ असा ठेक्यात खेळ रंगे.

शाळेतला पाऊस कधी सुट्टीचा आनंद घेऊन येई. पाण्यातल्या कागदी होड्या त्यावर आनंदाचे शीड मिरवत मिरवत वहात जात. ‘ए आई, पावसात जाऊ दे’ ची मग मनधरणी होई. बाळकरी वय उलटले, शाळकरी दिवस पालटले की, आपल्याबरोबर ऊन-पाऊसही तरुण होई. ‘धारानृत्य’ सुरू होई. होई नव्हे; चिरतरुण पाऊस आजही हे नृत्य माणसाच्या मनाबरोबर करतो. मग शिरीष पैंची चारोळी जीवंत होते;- ‘पाऊस थांबला, उन आलं, जग सोनेरी झालं’

या सोनेरी झळाळत्या जगात ऊन पावसाचे प्रणयरंग मग मिसळत जातात. ‘ओलेती’ या विशेषणाला गुलाबी रंग चढतो. ‘सगळीकडे झाडंच झाडं, शहर नाही हे, हे तर खेडं,’ असं मनाला वाटतं. धरतीच्या कलशात रिमझिम धारा बरसतात तेव्हा मन तुडुंब होतं, पावसानं न्हातं.ते कवी बनतं. म्हणूनच तर सगळ्याच कवींच्या काव्यात पाऊस डोकावला आहे. इंदिरा संतांच्या कवितेतला पाऊस कसा चैतन्यमयी होऊन खेळत रहातो. ‘पांघरून अंगावरती भरजरी शेला’ ही शेल्याची प्रतिमा त्यांच्या कवितेत वेगळेच रूप घेऊन येते. मृच्छकटिकातील चारुदत्त आणि वसंतसेनेचे प्रेमबंध या शेल्याला त्या बहाल करतात तेव्हा शेला पांघरणारी वसुंधरा मनोभावे प्रेममय होत जाते. ‘चारुदत्त हा कोण कोठुनि, अंगावरला फेकीत शेला.

वसंतसेना वसुंधरेने झेलुन तो हृदयाशी धरला, - किती सुंदर! त्यांच्या कवितेतून अनेक रूपे घेऊन पावसाचे येणे होते. ‘किती चातक चोचींनी प्यावा वर्षा ऋतू तरी’ ही असोशी केवळ मर्ढेकरांनाच नाही. सगळ्या सगळ्यांनाच आहे.

मात्र पाऊस २६ जुलै होऊन येतो तेव्हा ? ‘बरस असा की प्रिया न जाईल माघारा दारात’ ही विनवणी धुडकावतो तेव्हा ? ‘खल दु:शासन की झोंबतसे धरणीला’ असे रूप धारण करतो तेव्हा? सजणाच्या केवळ आठवणीच उरतात; अन् ओला पाऊस विरहाच्या जखमा ओल्या करतो तेव्हा ? इंदिरा संतच पुन्हा मनात बरसतात. ‘कौलारावर झडप घातली जळधारांनी.... घेरायास्तव- ’ अशा स्थितीत पावसाने बंदिस्त मन अन् शरीर पावसाच्या जुन्या आठवणींनी पेटून

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## ‘‘काटकोन त्रिकोण’’

**-मिनाक्षी जयकर**

नुकतीच एक गोष्ट वाचनात आली. गोष्टीचा लेखक महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागात अधिकारी होता. तेव्हाचा त्याचा अनुभव त्याने कथन केला होता. पाणी अतिशय कमी येते, सूनेला खूप उशीरापर्यंत पाणी भरत बसावे लागते; म्हणून एक वयस्कर गृहस्थ तक्रार घेऊन आले होते. लेखकाने संबंधित अधिकाऱ्यांकडे चौकशी केली. त्यानुसार तक्रार करणाऱ्या गृहस्थांच्या विभागात पाणीपुरवठा व्यवस्थित चालू होता. तक्रारीला वावच नव्हता. पण ते म्हातारे गृहस्थ काही ऐकेनात. त्यांचं एकच म्हणणं, खात्याचाच काही दोष असेल. शेवटी लेखकाने कुतुहलापोटी त्यांच्या घराला भेट दिली. तेव्हा सारा उलगडा झाला. त्यांच्या घरी प्रश्न पाण्याचा नव्हता. प्रश्न होता तो म्हतारबाबांचा. त्यांचं घर तसं छोटं होतं. म्हातारबाबा पहाटे लवकर उठत आणि काही ना काही करत बसत. यामुळे घरातील बाकीच्यांची झोपमोड होई. त्यावरून वादावादी होई. हे सर्व काही काळतरी टाळण्याकरता घरातील सूनेने शक्कल लढवली होती. तिने त्या म्हताराबाबांना खोटेच सागितले की सध्या पाणी कमी येते. हेतू हा की म्हतारबाबा वरच्या कार्यालयात तक्रारअर्ज करतील आणि त्याचा पाठपुरावा करण्यात त्यांचा थोडा वेळ जाईल. तेवढीच एक-दोन आठवडे घरात शांतता. परंतु तिच्या दुर्दैवाने(?) लेखक लगेचच तिच्या घरी गेला आणि तिचा हेतू साध्य होता होता राहिला !

मला वाटते, ही एक प्रातिनिधीक गोष्ट आहे. मानवाची आयुर्मर्यादा वाढल्यामुळे समाजातील वरीष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढले आहे. पूर्वी वयाची साठी गाठणे म्हणजे आयुष्याचा फार मोठा टप्पा पार करण्यासारखी गोष्ट होती. Now life begins at 60. वयाची उमेदीची वर्ष कुटुंबाची आर्थिक घडी बसवण्यात नोकरी-धंद्यात खर्ची घातल्यावर निवृत्तीनंतर आपले राहून गेलेले जीवन जगण्याचा काहीजण आपापल्यापरीने प्रयत्न करतात. काही आपल्या नातवंडामध्ये (हो, नातवंड-एकवचनी! कारण आजकाल हम दो-हमारा एकच्या जमान्यात एखादे नातवंड असले तरी खूप झाले.) आपल्या मुलाच्या आयुष्याचा जो काळ आपण श्गे केला, तो जगण्याचा प्रयत्न करतात तर काही आपले छंद पुनरुज्जीवित करण्याच्या मागे लागतात. हल्ली घरा-घरात एखाद-दोन आजी-आजोबा असतातच. त्यामुळे आधीची पिढी-नंतरची पिढी- Generation Gap -ताणतणाव हे सारे अपरिहार्यपणे आलेच. भले त्याचे प्रमाण कमी-अधिक असेल, सुसंस्कृतपणाच्या बुरख्याने आच्छादलेले असेल, पण म्हणून त्याची उपस्थिती नजरेआड करता येत नाही. कुठे सूनेला सासू-सासऱ्यांनी आपल्या अपत्याच्या आयुष्यात लुडबुड केलेली चालत नाही. तर कोणाचे जगावेगळे छंद घरच्यांकरता डोकेदुखी ठरतात. त्यातही जर सासू नसेल तर सासरा-सून या नात्यातला महत्त्वाचा दुवाच निखळतो. त्या नात्याला वेगळेच पदर

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

उठते, विकल होते. त्याच ‘ऐक जरा ना’ कवितेतली एक आठवण-

‘उठला जेव्हा बंद कराया उघडी खिडकी
कसे म्हणाला,
आठवते तुज ?
‘‘या डोळ्यांची करील चोरी
वीज चोरटी
हेच मला भय.’’... प्रत्येक आठवण तिला ‘ऐक जरा ना’ ‘ऐक जरा ना’ म्हणते आहे. असा आठवणींचा उच्छाद मांडणारा पाऊस! शहरात आपले सौंदर्य हरवून बसणारा पाऊस.

‘गावातील पाऊस
शहरात आला
गटारागटारातून
वाहू लागला....’ म्हणूनच पावसाला सखा म्हणताना दुर्गा भागवत कचरतात. आपल्या एका लेखात पावसाचे सुंदर रूप सादर करता करताच थबकून त्या म्हणतात.... ‘पण झोपड्यातील संसार उध्वस्त करणाऱ्या पावसाला मी सखा कसा मानू ? ‘सतेली पातेली’ चा संसार गळक्या छपराखाली ठेवून कुडकुडणाऱ्या गारठ्यात पावसाला तोंड देणाऱ्या घर धनिणीला कसे विसरू ?’ हे खरेच आहे. मिठी नदीच नव्हे; तर अशा असंख्य जीवंत बायांच्या नद्या सैरावैरा होतात तेव्हा ‘नको नको रे पावसा, असा धिंगाणा घालूस’ असंच म्हणावं लागतं.

लागतं अन् लागत नाहीही ! म्हणजे आपण अशा धिंगाण्याला पुरून उरतो, पावसाच्या राज्यात ‘पेर्तेव्हा’ म्हणतो तेव्हा पावसाचा छळही घडीभराचा ठरतो. आनंदच घडाभर होतो. भरभरून वाहू लागतो; दुथडी भरून.

११ जूनला असाच; अगदी अस्साच पाऊस कोसळत होता ना हो? आगगाड्यांचे वेळापत्रक कोसळलेले. साचलेल्या पाण्यातून वाहने मुंगीच्या गतीने सरकत सहनशक्तीची परिसीमा गाठणारी. दुपारपासूनच फोनाफोनीला सुरुवात. ‘‘प्रत्युष’ होणार ना?’’, ‘‘रंगशारदाजवळ पाण्याचे काय हालहवाल?’’ पण आपली कलाकार मंडळी दुपारी दोनपासूनच रंगमंचावर आपापल्या कामासाठी हजर होती.... आणि सात वाजता सायंकाळी ? रंगशारदाचे सभागृह अपेक्षेप्रमाणे गच्च भरलेले. पावसापाण्यातून तमा न बाळगता रसिकप्रेमी आले होते. त्यात भरत दाभोळकरही होते. भरून पावली आमची कलाकार मंडळी.

म्हणूनच.... म्हणूनच तर ना बाहेर पाऊस होता; तर आत सभागृहात टाळ्यांचा पाऊस पडत होता ? पाऊसच पाऊस ! भरभरून. प्रेमाचा, आपुलकीचा पाऊस. देणग्यांचा पाऊस. कौतुकाचा पाऊस. रसिक प्रतिसादाचा पाऊस. या पावसाची आम्ही दरवर्षी वाट पहातो.... पाहू. ‘ये रे, ये रे पावसा !’

## “We Rocked Again “

What can I say about Pratyush it was a real hit show again, it gave mee a platform to show my talent in the fields of dance and acting. The making of Modern Ramayan was fantastic, every time I remember those moments I smile. The goof ups that we all made were enjoyable. Both the roles were very challenging to play. How can we forget our favourite Rajas Ajinka (Sweet Raavan) & Prathamesh Talpade (funny Zatayu). After our one and half month of rehearsals we all achieved our goal. The making of Kalchakra was one of my best moments. Everybody in this play enjoyed a lot. My Haaga ho haaga ho and Aeuoo language was very challenging for me, thanks to Siddharth, Saurab, Mayura, Bhakti tai, Ashwin dada, Reema vahini, Akshay, Ashish Desai, Dishank, Nihar, Rajas kaka for supporting me to play this kind of role. Special thanks to Chandini Ajinkya (Aatya) for making delicious snacks for all of us. All of us enjoyed a lot. Thanks Bhakti tai for the Haaga ho language which u wrote for me I enjoyed playing this role. Dances were also nice.

It was really nice working with Bhakti Tai, Mohnish Shete, Sanjoo Talpade and Pavan, looking forward to working with them again.

Special thanks to the committee members for putting up this fantastic event. “hip hip hurray”, “We Rocked Again “

**- Swapneel Desai**

## In praise of artists of Pratyush

Those of us who have seen all the three Pratyush Events will agree that a major share of credit for their resounding success goes to our ever vibrant participants. One needs to appreciate the fact that most of the participants, be it students, professionals, housewives, etc had their daily chores to fulfill during the day before meeting in the evening for the practice sessions which at times must have been quite tiring. People who have witnessed the practice sessions will know the level of finesse and perfection demanded by Vishwas sir, our choreographer, and the credit goes to the participants, young and old, that they rose evenly to his expectations. We also need to appreciate the enthusiasm of those participants who not only took part in the dances but also switched quickly into important roles in the plays, which meant that they had to literally camp on the stage from beginning to end!!!

Kudos to Yuva Manch, Kudos to the PP youth

**-Anila Virag Dhairyawan**

(पान १ कॉलम ४ वरून)

चढतात आणि त्यातूनच एखादे ‘‘काटकोन त्रिकोण’’ सारखे नाटक जन्माला येते.

पण नव्या-जुन्या पिढीतील अंतर हे नेहमी काटकोन त्रिकोणातल्या कर्णाप्रमाणे मोठे असायलाच हवे का? गोष्टीतील लेखकाने त्या म्हातारबाबांना त्यांच्यासारख्याच एका वयस्कर गृहस्थांचे उदाहरण दिले. ते गृहस्थ पहाटे उठून फिरायला जात. मग योगासने, पेपरवाचन होईपर्यंत घरातली ऑफिस-शाळेची घाई-गडबड संपलेली असते. मग नातवंडाचं होमवर्क, बाजार वगैरे. संध्याकाळी सिनियर सिटिझन क्लब,मित्र-मंडळी, आणि त्यांच्या गंमती-जंमती. रात्री आपण आणि आपला रेडियो. मुलगा, सून, नातवंड आणि त्यांचा टी.व्ही. यांच्याशी त्यांचा काही संबंध नाही. प्रत्येकालाच काही असे आदर्श जीवन जगणे शक्य नाही. पण आयुष्याच्या संध्याकाळी स्वत:करता जगतानाच आपल्या, आपल्या मुलाच्या कुटुंबाला पूरक जगण्याचा प्रयत्न आपण निश्चितच करू शकतो. कोण जाणे, असे करताना एखादवेळेस काटकोन त्रिकोणाचा समभुज त्रिकोण ही होईल!

## Pratyush 2011

Pratyush 2011 followed in the footsteps of Pratyush 2010 & proved to be a grand success. My hearty congratulations to all, the Organizers, the Choreographer, the Artists & the Audience.

It’s a platform for all the Pathare Prabhus , old & young to show their talents in the field of drama and dance. The golden day dawned on 11th June 2011 when Pratyush 2011 was held at Rang Sharda, Bandra (E) at 19.30 hrs, after more than a month long practice, sometimes late at night. The drama followed by smart dances proved quite entertaining.

This years innovative idea of commencing the events by the entry of some artists through the audiences dispersing petals & flowers holding incense cups startled the audience who turned back to see what was falling on them & got pacified on seeing the artists in the act.

The way our choreographer Mr Vishwas Natekar & his supportive assistants Mr Aniket & Ms Shraddha helped some non dancers dance is worth appreciation. Due to Pratyush, we all came to know each other very well, made new friends in our own community which would not have been possible otherwise. The flow of events from drama to dance was amazing.

Special thanks to the organizers of Pratyush for encouraging artists from our community who are not professionals in this field & putting up a grand show rather than hiring professionals from outside to achieve success.

Hoping the next Pratyush will be a blast with innovative dances & dramas which will be the talk of the town & will be appreciated by one & all.

Thanking You,

**-Mr Jatin Dilip Navalkar**

## ‘प्रत्युष २०११’

यंदाचा ‘प्रत्युष’ पाहण्याचा योग ११ जूनला आला. एक आनंदोत्सवच तो. वर्षाच्या चिमुरडीपासून ८० वर्षांच्या चिरतरुणींमधला मनाला थक्क करणारा पण आनंद देणारा सोहळा होता. अशा करमणूक प्रधान कार्यक्रमासाठी किती मेहनत असेल याची एक कलाकार म्हणून मला निश्चित कल्पना आहे. आपापल्या क्षेत्रात २४ तास व्यस्त असलेल्या परभूंनी १-२ महिन्यांच्या रिहर्सलसाठी किती झोकून दिले असेल याची कल्पनाच करावी. काही स्वार्थ नसताना एवढं dedication फक्त मनाने तरुण असलेले सोकाजीच करू शकतात.

असाच विचार करता करता मी १९९७-१९९८ च्या काळात गेलो. साहित्य संघातील युवामंचचा तो पहिला कार्यक्रम. छोट्या तरुण-तरुणांची ती प्रेक्षागृहातील दिंडी. सौ. नंदिता धुरंधरने बसवलेली नृत्ये, विहंगचे विनोद-किस्से व त्याची शिस्तबद्ध ॲक्टिंग वगैरे मन:पटलावर आले. ‘युवामंच’ या मनाने-तनाने तरुण असणाऱ्यांची ती पहिलीच ठिणगी होती. १३ वर्षात त्या ठिणगीचे रूपांतर ‘प्रत्युष’सारख्या विलोभनीय इव्हेंटमध्ये झाले. रंगशारदेतील प्रत्येक परभूला त्याचा अनुभव आला. एक निखळ आनंद या करमणुकीच्या कार्यक्रमातून मिळाला.

पडद्याच्या पाठल्या आणि पुढल्या कलाकारांचे हार्दिक अभिनंदन. युवामंचच्या प्रत्येक सदस्याला व सुहासिनीताईंना धन्यवाद. त्यांच्या प्रयत्नांमुळे आम्ही इतका आनंद भोगू शकलो.

जाता जाता एक प्रेमळ सूचना: काही कुटुंबे या सोहळ्याला इच्छा असून येऊ शकली नाहीत कारण तिकीट-पासचा दर (रुपये ६००-३००) त्यांना झेपू शकला नाही. काही जणांनी ही व्यथा बोलून दाखविली, तीच मी आपणापुढे मांडतोय. यावर विचार करण्यास आपण सर्व सूज्ञ आहात.

Once again CONGRATES TO YOUALL.

धन्यवाद.

**-सुनील जयकर**



विहंग नायक
स्मृतिदिन: ९ जून

Together Towards Tomorrow

प्रत्युश '11
A NEW RIDING

११ जून २०११

# 'प्रत्युष'ची क्षणचित्रे




















छायाचित्रकार: **नंदू धुरंधर**




# ‘हस दे तू!’

## जिद्दी १९६४

पुन्हा एकदा मेहमूदला घेऊन आजच्या या अनोख्या गाण्याची ओळख करून देत आहे. मेहमूदची जादू काही औरच. पण आजचं गाणं निवडण्याचं खास कारण म्हणजे मन्ना डे यांची गायकी. एखादं शास्त्रीय संगीतावर आधारलेल गाणं असेल तर मन्ना डे यांची निवड केली जायची. त्यांनी अनेक प्रकारची गाणी गायली आहेत. रोमँटिक प्रेमगीत असो की, देशभक्तीपर गीत असो. भजन असो की, हलकंफुलकं विनोद गीत असो. सर्वप्रकारच्या गीतांत त्यांनी रंग भरला आहे आणि ती लोकप्रियही झाली आहेत. आजचं गाणं ‘जिद्दी’ या चित्रपटातील आहे. थोडसं शास्त्रीय बाजाचं गाणं आहे. पण मन्नादांनी या गाण्यात मेहमूदचं रडणं, विव्हळणं, उसासे टाकणं, त्याचं मध्येच नाचणं, त्याचा विलाप, त्याचं दु:ख सर्वकाही इतक्या विनोदी ढंगाने पेश केलं आहे की पूछो मत.

मेहमूद आणि शुभा खोटे दोघे विवाह मंडपात असतात. त्यांच्या विवाहात शुभा खोटेचा बाप धुमाळ खो घालतो. शुभा खोटेला घरात कोंडून ठेवतो. शेरवानी घातलेला मेहमूद जमिनीवर उपडा पडलेला असतो. हार तुरे तुटलेले. जवळच विझलेलं होमकुंड. नेहमीप्रमाणे संथलयीतील दोन ओळी मेहमूदची विलापिका.

दुनिया बनानेवाले सुन ले मेरी कहानी
रोये मेरी मोहब्बत तडपे मेरी जवानी
प्यारकी आगमें तन बदन जल गया
जाने फिर क्यों सताती है दुनिया मुझे
प्यार की आग में तनबदन .....
जल गया.

मेहमूद रडत रडत उठतो. होमातलं एक जळकं लाकूड छातीशी कवटाळून म्हणतो, ‘प्यार की आग में तन बदन जल गया’ रडता रडता तोल जाऊन मंडपातील खांबावर आपटतो ‘तन बदन जल गया’ मंडपातले रंगी बेरंगी दिवे पेटतात.

मैं रोता फिरू बादलोंकी तरहा
थंडी आहे भरू पागलोंकी तरहा
जाने फिर क्यों जलाती है दुनिया मुझे
प्यार की आग में....

शुभा खोटेला ज्या घरात कोंडून ठेवलेलं असतं त्या घराच्या छपरावर मेहमूद चढतो. चिमणीतून धुराचे लोट बाहेर पडत असतात -

मैं रोता फिरू बादलोंकी तरहा
बात जब मैं करू मुहसे निकले धुआँ
जल गया जल गया मेरे दिल का जहाँ
जाने फिर क्यों सताती है दुनिया मुझे
प्यार की आग मैं....

मेहमूद अंगावरचे कपडे फाडतो. त्याच्या तोंडातून जोरदार वाफ बाहेर पडते.

इष्क मुझको नचाता रहा है सदा
क्या क्या सपने दिखाता रहा है सदा
जाने फिर क्यों सताती है दुनिया मुझे
प्यार की आगमें....

मंडपात बँडवाले झोपलेले असतात. त्यातला एक जण, मोहन चोटी उठून मेहमूदचे कपडे ठीकठाक करतो. मेहमूद त्याच्याबरोबर नाच करतो. सगळे बँडवाले उठून ‘कम सप्टेंबर’ची धून वाजवतात. शेवटी धुमाळ मेहमूदची शेरवानी देखील घेऊन जातो.

चित्रपट - जिद्दी१९६४
संगीत - एस.डी.बरमन
गायक - मन्ना डे
गीत - हसरत जयपुरी
कलाकार - जॉय मुखर्जी, आशा पारेख, मेहमूद, शुभा खोटे, धुमाळ.

**-नंदकुमार विजयकर**
nandusuhas03@gmail.com

---

## Shri Ganeshayanamaha

**-Sanjoo Talpade**

There is a time in life when you feel that all those unfulfilled dreams have come true and those unexplored experiences have just been met. That one line can be termed as the recall that I have whenever I think about ‘Pratyush’.

Being a media professional it becomes very difficult to rate the projects that you have done because each of it has the same amount of efforts and planning that you are required to put in. But without a doubt I would term Pratyush as one of the experiences that stands out in the list of work that have done in the past and probably it would stay as that special experience in the future as well.

Prior to the opportunity that was given to me, of directing the play for this year’s Pratyush, I had limited and vague knowledge about the community and the commendable job that the members of Pratyush are doing to keep the PP culture alive. The person whom I thank for this opportunity is Mahesh mama (Mahesh Kothare). I had the privilege to work with him as a dialogue writer for his sci-fic, Zabardast. He always made me feel like an equal on the set. That is the hallmark of all creatively evolved people; they never talk you down but make you feel like you are a partner in their vision. It was Mahesh mama’s son, Adinath who recommended me to the organizing committee of Pratyush.

The beginning to the successful product began at Barista in Shivaji Park where I met Gunjarav, Moya and Deepak. I was struck by the positivity and optimism that these guys have within them. Gunjarav wanted a thriller which would grip the audience, we were throwing many ideas around when I remembered a spoof that I had written some time ago..and I suggested it…, Gunjarav was enthusiastic about it…he said..done done..lets do it..even Moya and Deepak gave a thumbs up on the idea. It took a while for this feeling to sink within me, because I could imagine the kind of faith and confidence the three of them gave me.

Then the rehearsals commenced. They say for any drama, it is the team that matters. And I was glad to be blessed with team which had people, who were although not professional actors but thoroughly professional in whatever was assigned to them. I was mighty impressed during the rehearsals observing the dedication and determination of the participants. It was amazing to see people, who are professionals in their respective fields, come after their office hours especially for the play practice sacrificing their regular routine. The main virtue of all participants was listening to the director and keeping their professional status at bay, this is something that defines the term ‘being disciplined and grounded’.

Whenever you direct people you are in a position of power and sometimes a strict attitude can put off your actors as they are very sensitive human beings. But luckily for me, my mom has given me a guru mantra earlier on in my career. She told me that “people who want too much perfection throw a lot of poison. They resemble the kalki snake… Hissing at everyone and pissing off everyone… So you have to couple perfection with love…Be like Krishna who dances on the hood of the poisonous snake kalki…Let love dominate over perfection”. This advice has always helped me and till date all my actors share a beautiful relationship with me, some have become a part of my family.

The rehearsals were going on smoothly but there was a twist in the tale. I had to fly to Jakarta to direct a spiritual play for my clients, this meant a gap of 12 days. But my favorite assistant Pavan made sure things were normal in my absence, he conducted the rehearsals and things went on without a hitch and when I came back my actors and the organizing committee told me how much they had missed me. But I had missed my actors more because I can easily say this (and I am not saying this because this is my community) that in our community actors are far better than other actors across the globe, they are more sincere dedicated and most importantly cultured.

The day of the play is etched in my memory for two prominent reasons, one for the heavy rains that lashed the city and created a big worry amongst us regarding the attendance of the audience and two, for the incredible turnout that we eventually got when the show was to commence. I was happy to see the theater full of people from our community making it to the play despite of the water-logged roads and the dark clouds which had not stopped pouring. And just like the hit turn out, even the show was a great hit. The act reflected that it was the team effort that had made it a hit. Had it not been that funny idea of creating a spoof on Ramayan popping in my mind, had it not been Gunjarav, Moya and Deepak showing their instant faith in me, had it not been Bhakti who skillfully scripted that second half which got the community people super-entertained and had it not been for Vishwas and his dancers who added that graceful and elegant flavor to the show that Pratyush 2011 would have been a

(cont. on page 6 col 2)

---

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



## Pratyush 2011: Another Rocking Event with Great Performance & Hard Efforts of All Participants & Yuva

**Ramayan:** Direction, Acting & mainly casting was too good. You chose a topic which was very sensitive but when it came alive it turned out to be sensational. There were few flaws which have to be overlooked as there were many measurable good things. I think Sanjeev has given his best contribution in making this play rock. I would like to add 2 liners about few Ramayan performers below.

Rajas, next entire year you will be remembered as Ravan among all PPs. Your acting was superb and for sometime people must have felt that Ravan was not a dangerous Rakshas, rather was a great humorous person. I don't know if you have any previous stage experience but you were the coolest on the stage.

Siddarth, need not mention your performance as I have seen you last year and even this time you showed good energy in building synergy with other co-stars. You were excellent in delivering dialogues and expressing timely reactions.

Sanjana, I think you have kept your acting shut-tedd own for a long time. You have such good talent which you should let flow freely. People love watching you, so do not stop and keep it flowing.

I would love to write on all the characters featured in this play but have to restrict only to the above prime characters. Laxman, Hanuman and other new faces were seen on stage and have done a good job despite being first timers. I am sure people will wish to see you again next year.

**Lagna 2050:** I feel this topic was a brilliant imagination. Imagining loosing Pathare Prabhu tradition and culture 40 years ahead is certainly a serious subject. I think the way we are heading to 2050 there is high possibility that we may lose our culture. I think people should think seriously about this and try to make the next generation understand the importance of our tradition & culture. I am sure we will not see any Pathare Prabhu family living in the style shown in the drama in the year 2050.

People performed very well as per directions. I liked the performances of Siddarth, Saurabh & Mayura. They were very natural and appropriate in their dialogue delivery and acting.

There were few dialogues mainly targeting a specific person which should have been avoided. This short play had some extended scenes which should have been avoided.

**Fashion Show (Benz):** Thanks to Benz for supporting this event. We got to see good trendy western designer wear. Your Model team exhibited Graceful Ramp Walk. I think many Sokajee's got opportunity to witness Glamorous Live Cat Walk for the first time.

**Dances:** I appreciate Natekar Sir, I think our team has found a Gem. Sir thanks again in supporting our young team on performing mind blowing dances. All our YUVA dancers have rocked again. I have no words to express about the dances & choreography. Looking forward to see you next year to set the stage on fire with some more great dance performances. So NAACHTEY RAHO! & SIR AAP NACHAATEY RAHO!

Summing up, the entire event was exciting with dance & act performances but flow of the show was missing in comparison to last year's show which was well connected from start to end. This year there were some leakages on that linkage.

This year it was like surfing TV channels rather than getting stuck to chair with excitement to watch next part of the show.

Overall the show was Entertaining, Rocking & this time Glamorous.


**--Charudutta Dhairyawan**

(cont. on page 5 col 2)

success.

The entire experience of working for Pratyush is something that cannot be quantified and may be that is the reason why this one article would not suffice my need to pen down the whole experience. But I close out by saying that, here is big thank you to all those people who went, out of the way to make the show a super success. The journey was worth it and even if it is over, the relations that I developed on the way are here to stay forever.

*// श्री इंद्रायणीप्रसन्न //* *// श्री गुरुदेव दत्त //*



**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

# प्रभुतरुणाची डायरी

## बाळा जो जो रे

| | | |
|---|---|---|
| सौ. मीताली आणि श्री. अभिजित कोठारे, | पुत्र, | खार. |
| सौ. नेहा आणि श्री. वैभव प्रकाश विजयकर, | पुत्र, | ऑस्ट्रेलिया |
| सौ. गायत्री आणि श्री. हर्षूल नंदकुमार नायक, | पुत्र | अमेरिका |

## आत्याबाई नाव बोला

आरा प्रतिक अजिंक्य,
आरित वैभव विजयकर

## नांदा सौख्यभरे

| | | | |
|---|---|---|---|
| १४-५-११ | श्री. निकेत किरण नवलकर | कु. स्मिता राजीव शेट्टी | (आंतर्ज्ञातीय) |
| २५-५-११ | श्री. रोहन राजन प्रधान | कु. पूजा अविनाश जोशी | (आंतर्ज्ञातीय) |
| २४-६-११ | श्री. हर्षल अशोक धराधर | कु. ऐश्वर्या रवीन्द्रनाथ मुरांजन | (आंतर्ज्ञातीय) |

## मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २५-५-११ | श्री. प्रसन्न सुरेश धैर्यवान, | वय ५३, | बोरिवली |
| २-६-११ | श्री. सुदेश बाळाराम राणे, | वय ८८, | खार |
| ४-६-११ | श्री. चंद्रहास यदुनाथ वैद्य, | वय ५६, | ठाकुरद्वार |
| २१-६-११ | श्रीम. मीनल मोरेश्वर कीर्तिकर | वय ८२ | विलेपार्ले |

***चुकीची दुरुस्ती***

गतांकी 'नांदा सौख्यभरे' मध्ये कु. अपर्णा मिलिंद व्यवहारकर आणि श्री. आदित्य वालावलकर असे कृपया वाचावे.

## प्रभुतरुणास देणगी

❖ सौ. स्वाती आणि श्री. संदीप शरद देसाई यांजकडून त्यांची कन्या दिप्ती हिच्या परीक्षेतील यशाप्रीत्यर्थ रु. २००/-

❖ श्रीम. हेमलता केशव कोठारे यांजकडून त्यांची कन्या प्राजक्ता हिच्या परीक्षेतील यशाबद्दल रु.५०१/-

❖ श्री. राजन गोविंदराव प्रधानकडून त्यांच्या सुपुत्राच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. १५१/-

❖ सौ. अंजली मिलींद धराधर यांजकडून त्यांची कन्या उत्तीर्ण झाल्याबद्दल रु. ५००/-

### 'प्रत्युष' साठी दिलेल्या देणग्या

| | |
|---|---|
| बेंझ कलेक्शन, (तरंग विजयकर) | ५०,०००/- |
| सारस्वत बँक | २५,०००/- |
| व्हिडियोकॉन | २५,०००/- |
| श्रीम. माधुरी विहंग नायक | १३,०००/- |
| श्री. रवीन्द्र रामराव मानकर | १०,०००/- |
| श्रीम. प्रमिला मधुकर तळपदे | ५,४००/- |
| सौ. नेत्रा, श्री.अजित मोरोबा विजयकर | ५,०००/- |
| श्रीम. सुहासिनी सुहास कोठारे | ५०००/- |
| प्रा. सुहासिनी अशोक कीर्तिकर | ५०००/- |
| डॉ. इंदू शक्तूर | ५०००/- |
| श्रीम. प्रियांका प्रभाकर | ५०००/- |
| श्री. बन्सी धुरंधर | ५,०००/- |
| डॉ. निवेदिता | ५०००/- |
| जान्हवी कीर्तिकर | ५०००/- |
| श्री. मिलिंद व्यवहारकर | ३,०००/- |
| एस. एम. जयकर व विक्रम जयकर | २०००/- |
| सुनील जयकर | २०००/- |
| डॉ. नीला अंजनीकुमार वेलकर | १००१/- |
| सौ. उषा,डॉ. अरुण वसंतराव जयकर | १००१/- |
| सौ. नीता आणि श्री. मिलिंद सेंजित | १००१/- |
| श्री. मिलिंद मनोहर सेंजित | १,००१/- |
| श्री. सिद्धकुमार धराधर | १०००/- |
| सौ. जान्हवी जगदीश कीर्तिकर | १०००/- |
| श्री. प्रवीण मानकर | १०००/- |
| सौ. प्रतिभा जगदीश कीर्तिकर | १०००/- |
| (श्रीम. उषा आणि श्री. वसंतराव आनंदराव धराधर यांच्या स्मरणार्थ) | |
| श्री. वीरपाल रामराव राणे | ५०१/- |
| सौ. अक्षदा, श्री. अजित तळपदे | २५१/- |

## परीक्षेतील सुयश

### माध्यामिक शालान्त परीक्षा (दहावी) (SSC)

कु. अदिती मेघदीप जयकर, ९३.२७%
श्री. अर्णव विक्रांत विजयकर, ८९.६४%
कु. वैजयंती विश्वास अजिंक्य, ८६.३६%
कु. वैभवी राजेश देसाई, ७७ %
कु. रसिका अभय मानकर, ७४%
श्री. अमोल किरण सुरेन्द्र व्यवहारकर, ७०%

### उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा

**सायन्स**

कु. सायली मिलिंद धराधर, ८७.६७ %

**कॉमर्स**

कु. भक्ती प्रणवेश धैर्यवान, ८० %
श्री. विक्रांत दिलीप नायक, ६७.६७ %

### डिप्लोमा इन फायनान्शियल मॅनेजमेंट, (युनिव्हर्सिटी ऑफ न्यू इंग्लंड)

सौ. प्राजक्ता अमित राजपूरकर (पूर्वाश्रमीची प्राजक्ता केशव कोठारे)

### एम. एस. कॉम्प्युटर सायन्स (कॅलिफोर्निया)

श्री. विभव सारंग आगासकर